॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १६ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* सुविचार *

दया हा खरोखरच दैवी गुण आहे.

# प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करा

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्हा नियोजन समितीअंतर्गत लोकप्रतिनिधींनी पुढील दहा दिवसाच्या आत शिफारशी सादर कराव्यात तसेच प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. विहित वेळेत निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यास संबंधित निधी इतर विकासकामांसाठी वळविण्यात येऊन प्रस्तावांना विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ.विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार किशोर दराडे, आमदार विठ्ठल लंघे, आमदार अमोल खताळ, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार हेमंत ओगले, आमदार अक्षय कर्डीले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार सत्यजित तांबे, आमदार विवेक कोल्हे, आमदार किरण लहामटे, आमदार काशिनाथ दाते आदी उपस्थित होते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय निधी, आदिवासी उपयोजना व इतर आदिवासी उपयोजनांचा शंभर टक्के निधी वेळेत खर्च केल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करत पालकमंत्री डॉ.विखे पाटील म्हणाले, आगामी सन २०२६-२७ या वर्षासाठी शासनाने सर्वसाधारण योजनेत ८८५ कोटी रुपयांच्या अंतिम आराखड्यास मंजुरी दिली आहे. या निधीतून प्रशासकीय कामकाजाला गती देण्यासाठी १५ वर्षांपेक्षा जुनी झालेली शासकीय वाहने निर्लेखित करावीत. तसेच तहसीलदार व नव्याने निर्माण झालेल्या तालुक्यांसाठी नवीन वाहने खरेदीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश दिले.



शहरांमधील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसेच अत्याचाराच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक नगरपरिषद व नगरपंचायतीने स्वतःच्या निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. त्याच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची राहील व पोलिस विभागाकडून त्याचे संनियंत्रण केले जाईल. शाळांच्या जुन्या व धोकादायक इमारतींच्या निर्लेखन प्रक्रियेत विलंब होऊ नये. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश ही पालकमंत्री डॉ.विखे पाटील यांनी दिले.

ते पुढे म्हणाले, विकास कामांच्या ठिकाणी माहिती फलक न लावणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. महामार्गांच्या रखडलेल्या कामांबाबत भूसंपादनातील अडथळे महसूल विभागाच्या मदतीने तातडीने दूर करावेत. वनविभागाची ना हरकत प्रमाणपत्रे वेळेत मिळण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय बैठक घ्यावी. ग्रामीण भागातील सायंकाळच्या भारनियमनामुळे नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने हे भारनियमन दुपारच्या वेळेत करण्याचे नियोजन करावे. अतिभारित रोहित्रांचा प्रश्न सोडवून कृषी पंपांना पुरेशा दाबाने वीजपुरवठा सुनिश्चित करण्यात यावा. तालुकास्तरावर आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी असलेली केंद्रे अपुरी असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे अतिरिक्त केंद्रे सुरू करण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करावा.

अहिल्यानगर-मनमाड रस्त्याचे काम रखडल्याबद्दल संबंधित दोषी कंत्राटदारावर कठोर कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकण्यात यावे. पावसाळ्यापूर्वी रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत करावेत तसेच लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील शाळा दुरुस्ती व विकासकामांची अद्ययावत माहिती लेखी स्वरूपात उपलब्ध करून द्यावी, अश्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

शहरातील नवीन रेल्वे उड्डाणपुलावर वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने संयुक्त पाहणी करावी. संबंधित क्षेत्र अपघातप्रवण घोषित करून गतिरोधक, दिशादर्शक फलक व अन्य सुरक्षा उपाययोजना तातडीने कराव्यात. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी ते शनिशिंगणापूर रस्त्याच्या कामांना प्राधान्याने गती देऊन ते वेळेत पूर्ण करण्यात यावे.

शहरातील मुख्य चौकांमधील अतिक्रमणामुळे होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवावी. तालुक्याच्या ठिकाणी क्रीडांगणांसाठी जागेची कमतरता लक्षात घेऊन शेती महामंडळाची जागा उपलब्ध करण्यासाठी महसूल व क्रीडा विभागाने समन्वय साधावा. जागेअभावी शासनाचा निधी परत जाऊ नये यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

### या देवस्थांना मिळाला ‘क’वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा

■ जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सावरचोळ (मेंगाळवाडी), ता. संगमनेर येथील श्री बिरोबा देव मंदिर, भानगाव ता. श्रीगोंदा येथील श्री भानेश्वर मंदिर देवस्थान, बेलापूर ता. अकोले येथील श्री योगी रामदास बाबा देवस्थान ट्रस्ट, काटाळवेडा ता. पारनेर येथील श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट तसेच मिरजगाव ता. कर्जत येथील श्री संत सावता माळी मंदिर, महादेव मंदिर देडगाव, ता. नेवासा या सहा ग्रामीण तीर्थक्षेत्रांना ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली.

## SPOT NEWS

### शासन करणार १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी

● **मुंबई –** राज्यात कांद्याचे दर कोसळल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज साता-यातील कार्यक्रमात केंद्र सरकारने महाराष्ट्रात आजपासून १२ रूपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी सुरू केल्याचे जाहीर केले. यासोबतच थकीत शेतक-यांना ३० जूनपूर्वी कर्जमाफी देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काटकसरीच्या आवाहनाला अनुसरून राज्य सरकार पुढील ६ महिने कोणताही मोठा कार्यक्रम आयोजित करणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यात कांद्याचे दर कोसळल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आखाती देशातील युद्ध, निर्यात बंदी आणि निसर्गाच्या प्रकोपामुळे कांद्याचा खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आज प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना कांदा विकत घेण्याची विनंती केली. या विनंतीला मान देऊन आजपासून महाराष्ट्रात शिवराज सिंह चौहान आणि पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वात १२ रुपये ३५ पैशांनी कांद्याची खरेदी सुरु होत आहे. हा शेतकऱ्यांना मोठा दिलासा ठरेल, असे फडणवीस म्हणाले.

### मान्सून २६ मे रोजी केरळात दाखल होणार

● **मुंबई –** केरळमध्ये नैऋत्य मान्सून वेळेआधी दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली. शुक्रवारी जाहीर करण्यात आलेल्या अंदाजानुसार २६ मे २०२६ रोजी मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचू शकतो. यात चार दिवसांचा फरकही असू शकतो. त्यामुळे २२ मे ते ३० मेदरम्यान कधीही मान्सून केरळात धडकू शकतो, असा अंदाज वर्तविला आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात दाखल होण्याची शक्यता आहे तर २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होऊ शकतो.

# राज्यात पुन्हा ३० मे पासून मराठ्यांचा एल्गार

● **जालना । वीरभूमी –**

मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा अंतरवाली सराटीत ३० मे पासून आमरण उपोषणाला सुरुवात करणार आहेत. या आंदोलनाला ३ कोटींपेक्षा जास्त मराठा बांधव सहभागी होणार आहेत. जरांगे पाटील यांनी आज (दि. १६) पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा-कुणबी प्रमाणपत्रे देणे बंद केले आहे. आंदोलन सुरू करण्याच्या आधी सर्वांना प्रमाणपत्रे देऊन पडताळणी करावी, तुमचं शहाणपण मराठ्यांच्या समोर नको, अन्यथा आंदोलन एवढं तीव्र करू की मुख्यमंत्री फडणवीस यांना चारही दिशांना मराठेच दिसतील, असा इशारा देत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे.

अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषदेत बोलताना जरांगे म्हणाले की, मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी टाळाटाळ सुरू आहे. अधिकारी हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र देत नाहीत. सरकारने देऊ नये म्हणून सांगितलं आहे, असे सांगतात, याला जबाबदार फडणवीस आहेत. कारण मुख्यमंत्रीच सर्वेसर्वा असतो, असे फडणवीस यांनीच एका भाषणात सांगितलं होतं. त्यामुळे प्रमाणपत्रे त्यांनीच रोखली, असा आरोप त्यांनी मुख्यमंत्र्यांवर केला आहे.

# पेट्रोल, डिझेल ३ रुपयांनी महागले

● **नवी दिल्ली । वीरभूमी –**

इराण-अमेरिका युद्धानंतर पेट्रोल, डिझेल, गॅस पुरवठ्याची साखळी विस्कळीत झाली असून, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढत गेल्याने आणि सातत्याने रुपयाचे अवमूल्यन होत असल्याने अखेर पंतप्रधान मोदी यांनी आज पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रतिलिटर तब्बल ३ रुपये वाढ करून महागाईचा बॉम्ब फोडला. आधीच गॅस सिलिंडरचे दर वाढविण्यात आले होते. आज पेट्रोल, डिझेलची दरवाढ केल्याने महागाईचा भडका उडाला असून, सर्वसामान्यांचे जगणे आता कठीण होणार आहे. कारण पेट्रोल, डिझेल दरवाढीमुळे प्रवासासोबत आता सर्वच वस्तू महागणार आहेत.

मध्य-पूर्वेतील तणावाचा भारतावर मोठा परिणाम झाला आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि रुपयाच्या घसरणीमुळे अर्थव्यवस्थेसमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे १ मे नंतर गॅस सिलिंडरपासून पेट्रोल आणि डिझेलपर्यंत सर्वच वस्तूंच्या किंमती वाढल्या. तसेच काही जीवनावश्यक वस्तूंच्याही किमती वाढल्या. मुळात पेट्रोल, डिझेलच्या दरावरच सर्व गोष्टी अवलंबून आहेत. आता इंधन दरात वाढ झाल्याने वाहतूक भाडे, प्रवास खर्च वाढणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना फार मोठा झटका बसला आहे.

केंद्र सरकारने काल साखर निर्यातीवरील बंदीबाबत मोठा निर्णय घेतला आणि आज लगेचच पेट्रोल आणि डिझेलच्या भावात ३ रुपयांनी वाढ केली. त्यामुळे आता टॅक्सीचालक आणि रिक्षाचालकांनीही भाडेवाढ करण्याचे संकेत दिले. या आधी १ मे रोजी सरकारी कंपन्यांनी व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ९९३ ने वाढ केली. या दरवाढीमुळे मुंबईसह अनेक शहरांमध्ये किमती ३ हजारांच्या आसपास आहेत.

# शहीद जवानांच्या मूळ गावी स्मारक उभारण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । शहीद जवानाच्या कुटुंबास एक कोटींची मदत; गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

देशाच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या शहीद जवानांचे केवळ स्मरण न राहता त्यांच्या बलिदानाची स्मृती कायम राहावी, यासाठी त्यांच्या मूळ गावी स्मारके उभारण्याबाबत प्रशासन कटिबद्ध असल्याची ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान व पुरस्कार सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे , आ. अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील शहीद जवान शिपाई संदीप पांडुरंग गायकर यांच्या पत्नी श्रीमती दिपाली संदीप गायकर यांना राज्य शासनाच्या वतीने एक कोटी रुपयांचा धनादेश पालकमंत्र्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी पालकमंत्र्यांनी शहीद कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत, प्रशासन व संपूर्ण जिल्हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वास दिला.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, उल्लेखनीय कार्यातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःसह जिल्ह्याचाही लौकिक वाढवला आहे. प्रशासनातील सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यभर वाढला असून शासनाला या गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सार्थ अभिमान आहे. जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात पोलीस दलाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगताना त्यांनी पोलीस अधिकारी व जवानांचे विशेष कौतुक केले. मनुष्यबळाची कमतरता असतानाही संपूर्ण जिल्ह्याच्या सुरक्षेची जबाबदारी सक्षमपणे पार पाडणाऱ्या पोलीस दलाच्या तत्परतेमुळे जिल्हा अधिक सुरक्षित राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

कोविड ड्युटी बजावताना मृत्यू झालेल्या ग्रामपंचायत शिपाई कै. शिवाजी भीमाजी गुडेकर यांच्या वारसदार रविंद्र शिवाजी गुडेकर व राजेंद्र शिवाजी गुडेकर यांना ५० लाख रुपयांची मदत यावेळी प्रदान करण्यात आली. विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय दशरथ घोगरे यांना ‘वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार’, पोलीस पाटील दादासाहेब गणपत भोसले यांना ‘राज्यपाल विशेष उल्लेखनीय सेवा पुरस्कार’ तसेच ग्राम महसूल अधिकारी संगीता मुरलीधर मगर यांचा गौरव करण्यात आला. महिला व बालविकास विभागाच्या वतीने देण्यात येणारा ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार’ सावित्रा प्रशांत गायकवाड आणि संगीता अरविंद मालकर यांना प्रदान करण्यात आला.

पोलीस व कृषी विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट सेवेबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक वैभव मनोहर कलुबुर्मे, मुख्तारखान गुलजारखान पठाण, प्रल्हाद भानुदास गिते, नितीन पोपट गांगुर्डे, मनोहर नामदेव शेजवळ, अजय नारायण नगरे, संजय जबाजी खंडागळे, गोविंद दादासाहेब गोल्हार, राजू आप्पासाहेब सद्रिक, राजेंद्र केशव पाटोळे, सुनील बबनराव नेहूल आणि प्रविण पुंडलिक साळुंखे यांना ‘पोलीस महासंचालक पदका’ने गौरविण्यात आले. तसेच कृषी विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवल्याबद्दल सहाय्यक कृषी अधिकारी किरण सुदाम घोडके, उपकृषी अधिकारी विजय राजाराम केदारे, मंडळ कृषी अधिकारी किरण हनुमंत उगले, तालुका कृषी अधिकारी अशोक रुपचंद वाळके आणि उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय महादेव गोसावी यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

SPOT NEWS

## रविवारी कोपरगावात गुणवंत विद्यार्थ्यांचा आ. आशुतोष काळेंच्या हस्ते गुणगौरव

**● कोपरगाव । वीरभूमी–**

विधानसभा मतदारसंघातील एच.एस.सी. आणि एस.एस.सी. परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते रविवार (दि.१७) रोजी कलश मंगल कार्यालय, कोपरगाव येथे भव्य गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे. मागील कित्येक वर्षापासून एच.एस.सी. आणि एस.एस.सी. परीक्षेत यश मिळविणाऱ्या गुणवंतांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मोठ्या थाटात गुण गौरव केला जात आहे. केवळ गुणवत्तेचे कौतुकच नाही तर विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याहीवर्षी हा सोहळा माजी आमदार अशोकराव काळे अध्यक्षतेखाली पार पडणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून १४ व्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे लाडके हास्यकवी अशोक नायगावकर हे उपस्थित राहणार आहे. हास्यकवी अशोक नायगावकर यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला साहित्याची आणि विनोदाची एक विशेष झालर प्राप्त होणार असून त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्षाकडे सकारात्मकतेने पाहण्याची नवी दृष्टी मिळणार आहे. तालुक्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवले आहे. अशा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आमदार आशुतोष काळे व प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात येणार आहे. या गुण गौरव सोहळ्याला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्याचे आवाहन कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ‘शब्द फुलांची ओंजळ’ काव्यसंग्रहाचे योगेश सोमण यांच्या हस्ते प्रकाशन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

ग्रामीण संस्कृती, माणसांमधील जिव्हाळ्याची नाती, आईचे ममत्व, भक्तीभाव आणि ग्रामीण जीवनातील सहज-सोप्या भावविश्वाचा हृदयस्पर्शी आविष्कार घडविणाऱ्या कवी सखाराम गोरे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित ‘शब्द फुलांची ओंजळ’ या काव्यसंग्रहाचे प्रकाशन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे अध्यक्ष तसेच ख्यातनाम अभिनेते, दिग्दर्शक आणि लेखक योगेश सोमण यांच्या हस्ते झाले.अहमदनगर जिल्हा वाचनालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रकाशन सोहळ्यास साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी व महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल या कार्यक्रमात गणराज प्रकाशनच्या वतीने योगेश सोमण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, विक्रम राठोड, शिल्पा रसाळ, सखाराम गोरे, प्रा. गणेश भगत, नाना डोंगरे, सदानंद भणगे आदी उपस्थित होते.

# पाथर्डीत स्वच्छतागृहासाठी तीव्र आंदोलनाचा इशारा

### पंधरा दिवसांत उपाययोजना करा । महिला, व्यापारी आणि नागरिकांच्या गैरसोयीबाबत देवा पवार यांचा संताप

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील नागरी समस्यांकडे पालिकेचे पूर्ण दुर्लक्ष होत असून बाजारपेठेतील व्यापारी, ग्राहक तसेच सर्वसामान्य नागरिकांची स्वच्छतागृहाअभावी मोठी गैरसोय होत आहे. येत्या पंधरा दिवसांत तातडीने स्वच्छतागृहाची व्यवस्था न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नगरसेवक तथा समविचारी कार्यकर्ते मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात तीव्र आंदोलन करतील, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे गटनेते तथा नगरसेवक देवा पवार यांनी दिला आहे.



याबाबत माहिती देताना पवार म्हणाले की, शहरात स्वच्छतागृहांची कमतरता असून स्वच्छतेची कामेही व्यवस्थित होत नाहीत. शहरात डुकरे आणि भटकी कुत्री यांचा सुळसुळाट वाढला आहे. विशेषतः बाजारपेठेत येणाऱ्या महिला ग्राहक आणि विक्रेत्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

शहराचा विस्तार आणि बाजारपेठेचा विकास झपाट्याने झाला असला तरी त्या तुलनेत नागरी सुविधांचा विकास झालेला नाही. गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी संघटना, महिला मंडळे, गणेश मंडळे तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून स्वच्छतागृहाची मागणी केली जात आहे. मात्र, लाखो रुपये खर्चून पालिका कार्यालयाशेजारी बांधण्यात आलेले स्वच्छतागृह प्रचंड घाण आणि दुर्गंधीमुळे वापरण्यायोग्य राहिलेले नाही.

कोट्यवधी रुपयांची विकासकामे पूर्ण झाल्याचा दावा पालिका प्रशासन करत असले तरी शहरातील मूलभूत समस्या कायम आहेत. गावाची स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, सर्वत्र पथदिव्यांची व्यवस्था आणि सुस्थितीतील सीसीटीव्ही ही नागरिकांची किमान अपेक्षा असल्याचे पवार यांनी सांगितले.

पाईपलाईनच्या कामामुळे फुटलेल्या जलवाहिन्यांची वेळेवर दुरुस्ती न झाल्याने काही भागांत गटारमिश्रित तर काही ठिकाणी मातीमिश्रित दूषित पाणी नळाद्वारे येत असल्याची तक्रारही त्यांनी केली. या गंभीर समस्यांकडे प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

गेल्या अनेक वर्षांपासून स्वच्छतागृहाची मागणी करणाऱ्यांची चेष्टा केली जाते. अशा परिस्थितीत नागरिक, व्यापारी, ग्राहक आणि महिलांच्या अडचणी कधी दूर होणार, हा खरा प्रश्न असल्याचे पवार म्हणाले.

प्रशासकीय राजवटीतही हा प्रश्न मांडण्यात आला होता. सध्याचे मुख्याधिकारी यापूर्वी प्रशासक म्हणून येथे कार्यरत होते. त्यामुळे परिस्थितीची त्यांना पूर्ण माहिती आहे. मात्र, तांत्रिक कारणे पुढे करून या प्रश्नाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात असल्याने नागरिकांमध्ये पालिका प्रशासनाविषयी संताप वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रश्नावर पुन्हा पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, यासाठी पालिका प्रशासनाला पंधरा दिवसांची मुदत देत आहोत. या कालावधीत प्रश्न न सुटल्यास आंदोलन तीव्र स्वरूपाचे असेल आणि त्यामध्ये वरिष्ठ नेतेही सहभागी होण्याची शक्यता असल्याचा इशाराही पवार यांनी दिला.

या आंदोलनात सविता भापकर, मंगल सोनटक्के आणि रेखा हंडाळ यांचाही सहभाग राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## भिंगार वेस येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर; कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भिंगार वेस परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे हाल होत असून, या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी भिंगार येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने केली आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी भिंगार वेस चौकात कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शहर वाहतूक शाखा तसेच भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनला देण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, संपत बेरड, अनिल तेजी, सुदाम गांधले, दीपक लीपाने, अजिंक्य भिंगारदिवे, सागर चवंडके, दिनेश लंगोटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भिंगार वेस हा परिसर हा अहिल्यानगर शहराला जोडणारा अत्यंत वर्दळीचा भाग मानला जातो. येथे सतत वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र वाहतूक नियंत्रणासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, प्रवासी तसेच दुचाकी व चारचाकी वाहन चालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भिंगार वेस परिसरातील वाहतूक परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. १२ मे रोजी या ठिकाणी झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे एका रुग्णवाहिकेलाही अडकून पडावे लागले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, रुग्णवाहिकेच्या चालकाला स्वतः वाहनातून खाली उतरून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करावा लागला.

## भटके विमुक्त समाज जनगणनेतून वंचित राहू नये

### प्रशासनाला विशेष सूचना देण्याची मागणी । सहारा संस्थेचे निवेदन

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**



राज्यात सुरू असलेल्या घरगणना आणि एसआयआर प्रक्रियेत भटके विमुक्त समाजातील एकही कुटुंब वंचित राहू नये, यासाठी सहारा सर्वांगीण विकास संस्थेने प्रशासनाकडे विशेष मागणी केली आहे. प्रगणक आणि बीएलओ यांनी गावाबाहेरील पाल, झोपड्या व स्थलांतरित कुटुंबांपर्यंत पोहोचून शंभर टक्के नोंदणी करावी, असे निवेदन संस्थेच्या वतीने देण्यात आले.

संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, भटके विमुक्त समाजातील अनेक कुटुंबे आजही अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. रोजगाराच्या शोधात सतत स्थलांतर होत असल्याने त्यांची नावे जनगणना आणि एसआयआर प्रक्रियेतून वगळली जाण्याची शक्यता आहे. अनेकांकडे ओळखपत्र, रेशन कार्ड किंवा निवासाचा पुरावा नसतानाही प्रत्यक्ष वास्तव्यानुसार त्यांची नोंद होणे आवश्यक असल्याचे संस्थेने स्पष्ट केले.

गावाबाहेरील वस्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि सोबती गटांचे सहकार्य घ्यावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. भटके विमुक्त समाजाची नोंदच झाली नाही, तर भविष्यातील शासकीय योजना, हक्क आणि संविधानिक लाभांपासून हा समाज पुन्हा वंचित राहू शकतो, असा इशाराही संस्थेने दिला आहे. यावेळी श्रीगोंदा येथील नायब तहसीलदार नितीन शिर्के यांनी स्वजनगणनेचा व्हिडिओ दाखवत, स्वजनगणना करून मिळणारा कोड दाखवा, त्यामुळे जनगणनेत कोणतीही चूक होणार नाही, असे सांगितले.

भटके विमुक्त समाजाला प्रशासनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे, असे संस्थेच्या वतीने नमूद करण्यात आले. यावेळी संतोष भोसले, छाया भोसले, पल्लवी सोनवणे, दत्ता गोसावी आणि सलमान शेख उपस्थित होते.

# वनकुटे ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला पुन्हा उधाण

### चौकशी अहवालांनंतरही कारवाई नाही । आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे ग्रामस्थांचे निवेदन

**● पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यातील वनकुटे ग्रुप ग्रामपंचायतीतील कथित लाखो रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाने पुन्हा एकदा जोर धरला असून, या प्रकरणात तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे केली आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित आर्थिक गैरवापर, पदाचा गैरवापर तसेच चौकशी अहवालांतील निष्कर्षांच्या आधारे संबंधितांवर त्वरीत कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याबाबत संतोष बबन केदारी, सुरेश सिताराम गागरे आणि बबन सखाराम हुलावळे यांनी ग्रामस्थांच्या वतीने आमदार दाते यांना निवेदन सादर केले. या निवेदनात गटविकास अधिकारी, पारनेर यांनी सादर केलेल्या दि. १४ ऑक्टोबर २०२५ आणि दि. ७ एप्रिल २०२६ रोजीच्या चौकशी अहवालांचा संदर्भ देण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वनकुटे ग्रामपंचायतीमध्ये लाखो रुपयांचा आर्थिक गैरवापर व पदाचा गैरवापर झाल्याबाबत मागील अनेक महिन्यांपासून विविध स्तरांवर तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत संबंधित विभागाकडून चौकशी करण्यात आली. त्यानंतर दोन स्वतंत्र चौकशी अहवाल सादर करण्यात आले असून, त्यामध्ये ग्रामपंचायतीच्या कारभारातील अनेक अनियमित बाबी निदर्शनास आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

मात्र, चौकशी अहवाल सादर होऊनही संबंधितांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे पुढे होणाऱ्या आर्थिक गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तातडीने प्रशासकीय निर्णय घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे स्पष्ट मागणी केली आहे की, संपूर्ण चौकशी व अंतिम कारवाई पूर्ण होईपर्यंत वनकुटे ग्रामपंचायतीची कोणतीही देयके, बिले किंवा निधी अदा करण्यात येऊ नयेत. तसेच नवीन विकासकामांना मंजुरी देणे, कामांचे वाटप करणे आणि कर्मचारी भरती प्रक्रिया राबविणे तात्पुरते थांबविण्यात यावे. अन्यथा भविष्यात आणखी आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येणार नसल्याची भीतीही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.



दरम्यान, वनकुटे ग्रामपंचायतीतील या कथित गैरव्यवहार प्रकरणामुळे तालुक्यात मोठी चर्चा रंगली असून, आता ग्रामस्थांनी थेट आमदारांकडे धाव घेतल्याने या प्रकरणाला राजकीय स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आमदार काशिनाथ दाते या प्रकरणात कोणती भूमिका घेतात व प्रशासनाला कोणत्या सूचना देतात, याकडे ग्रामस्थांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# रस्ते विकासकामात खंडेश्वर मंदिर परिसरातील हातपंप बुजवला

## ठेकेदाराच्या मनमानीमुळे नागरिक व जनावरांवर पाणीटंचाईचे संकट | आंदोलनाचा इशारा

**● पारनेर | वीरभूमी –**

पारनेर–जामगाव रस्त्याच्या डांबरीकरण आणि रुंदीकरणाचे काम सुरू असताना संबंधित ठेकेदाराने खंडेश्वर मंदिर परिसरातील ओढ्यातील हातपंपावर खडी आणि माती टाकून तो पूर्णपणे बुजवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विकासकामांच्या नावाखाली स्थानिक नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



खंडेश्वर मंदिर परिसरातील हा हातपंप परिसरातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी मानला जात होता. मते वस्ती, कुलट वस्ती, गाडगे वस्ती आणि चौधरी वस्ती येथील शेतकरी, नागरिक तसेच शेतात राबणाऱ्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी या हातपंपाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढलेली असताना या हातपंपाचे महत्त्व अधिक वाढले होते. मात्र, ऐन उन्हाळ्यातच हा पाण्याचा मुख्य स्रोत बंद झाल्याने नागरिकांवर पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

पारनेर–जामगाव रस्त्याचे काम सुरू असताना हातपंपावर खडी व मातीचे ढीग टाकले जात असल्याचे लक्षात येताच परिसरातील जागरूक नागरिक बापूसाहेब कुलट आणि इतर ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी हातपंपावरील खडी आणि माती तात्काळ हटवून हातपंप पूर्ववत करण्यात येईल, असे तोंडी आश्वासन ग्रामस्थांना दिले होते.

मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. संबंधित ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे परिसरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

> नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी असलेला हातपंप पूर्ववत करून देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल.
> – कल्याण थोरात, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पारनेर

या परिसरातील नागरिकांची गरज लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून हातपंप स्वच्छ करून पूर्वस्थितीत आणावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा, हक्काच्या पाण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मते वस्ती, कुलट वस्ती आणि परिसरातील संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# SPOT NEWS

## कु. आरती जगताप हीची पोलीस दलात निवड

**● कोपरगाव | वीरभूमी–**



कोपरगाव तालुक्याच्या ग्रामीण भागातील कान्हेगाव येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील गायत्री राजेंद्र जगताप हिने कठोर परिश्रम घेऊन पोलिस कॉन्स्टेबल पदासाठी घेण्यात आलेली परीक्षा उत्तीर्ण होऊन नेत्रदीपक यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील मुलींमध्येही गुणवत्ता व टॅलेंट आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या जिद्दीला व मेहनतीला आमचा सलाम आहे. गायत्री व अश्विनी घारे यांची पोलिस कॉन्स्टेबलपदी झालेली निवड कोपरगाव तालुक्यासाठी अभिमानास्पद असून, त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे यश मिळवून आपल्या आई–वडिलांच्या कष्टाचे सार्थक केले आहे. आरतीने पोलिस दलात भरती होण्याचे स्वप्न पाहिले आणि जिद्द व कठोर परिश्रमाच्या बळावर हे स्वप्न साकार केले. यशामध्ये त्यांच्या आई–वडिलांचाही मोलाचा वाटा आहे. जिद्दीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर व अडीअडचणीवर मात करत हे नेत्रदीपक यश मिळवून कोपरगाव तालुक्याचा लौकिक वाढविला आहे. ग्रामीण भागातील तरुण–तरुणींसाठी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी कुठलाही नकारात्मक विचार न करता सकारात्मक विचार करून आव्हानांना सामोरे गेले पाहिजे. जिद्द न सोडता, शेवटपर्यंत प्रयत्न करा, यश नक्कीच प्राप्त होईल असा मोलाचा सल्ला हरिभक्त परायण नवनाथ कथाकार वसंत महाराज भाकरे यांनी यावेळी दिला. सदर प्रसंगी कु. आरतीचा कान्हेगाव, भोजडे, संवत्सर ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## उन्हाळी सुट्टीतील मे-जून वेतन वेळेवर द्या : शिक्षक परिषेदेची मागणी

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**

राज्यातील खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उन्हाळी सुट्टी कालावधीतील मे व जून २०२६ चे नियमित वेतन वेळेवर अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषद राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव रणजित देओल यांच्यासह शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना दिल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

## ह.भ.प.भिमराज जाधव यांचे निधन

**● कोपरगाव | वीरभूमी–**



शहरातील जुन्या फळीतील वारकरी संप्रदायातील हभप. भीमराव महाराज जाधव यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पाठीमागे मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कोपरगाव शहरातील सर्व धार्मिक कार्यक्रम व कथा प्रवचनकार म्हणून त्यांची ओळख होती. अहिल्यानगर जिल्ह्या वारकरी संप्रदायाचे ते उपाध्यक्ष होते. तसेच हनुमान प्रसादिक मंडळाचे अध्यक्ष व उत्कृष्ट गायनाचार्य होते. पत्रकार संतोष जाधव यांचे ते वडील होत.

## शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक आ. दराडे यांची अधिकाऱ्यांना सूचना

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**

जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत शुक्रवारी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक पार पडली. शहरातील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या या बैठकीत शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसमोर आपल्या अडचणींचा पाढा वाचत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीस जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, संध्या भोर यांच्यासह माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, मुख्याध्यापक संघाचे सचिव संभाजी पवार, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, प्रा. सुनील पंडित, अमोल ठाणगे, रवी गावडे, अशोक आव्हाड, तौसिफ शेख, उमेश शिंदे, प्रसाद सामलेटी, संजय थोरात, रवींद्र डमाळे, देवढे सर, दिलीप काटे आदींसह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

आमदार दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे व वैभव सांगळे यांच्या पुढाकारातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीदरम्यान शिक्षकांनी त्यांच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी, प्रशासकीय विलंब, आर्थिक अडचणी तसेच विभागीय स्तरावरील त्रुटींबाबत सविस्तर मांडणी केली. अनेक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त केली. प्रलंबित मुख्याध्यापक मान्यता, निवडश्रेणी मान्यता, अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन या प्रश्नांवर चर्चा करत आमदार दराडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच रोस्टर तपासणीतील विलंब, संचमान्यतेतील त्रुटी दुरुस्तीचे रखडलेले प्रस्ताव, अनुकंपा नियुक्ती मान्यता, रजा कालावधीत नियुक्त शिक्षकांच्या मान्यतेसंदर्भातील अडचणी यावरही अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

## लोक कल्याणासाठी केलेले कार्य कौतुकास्पद

### अभय आव्हाड | हनुमान टेकडी येथे महामृत्युंजय यज्ञ व शिवमहापुराण कथेचा शुभारंभ

**● पाथर्डी | वीरभूमी–**

लोक कल्याणाच्या हेतूने धार्मिक कार्य करणे व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कल्याणासाठी घेतलेला ध्यास स्तुत्य व कौस्तुकास्पद असून महामंडलेश्वर लालदास महाराज यांनी मानवी उत्कर्ष शांती आणि सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी महामृत्युंजय यज्ञ आयोजित केला आहे. यामुळे समाजातील दु:ख कमी होऊन सुख- शांती व समृद्धी नांदेल असा विश्वास नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी व्यक्त केला.



पाथर्डी मोहटादेवी रस्त्यावरील कारेगाव परिसरातील हनुमान टेकडी मंदिर देवस्थानच्या वतीने महामृत्युंजय यज्ञ व शिवमहापुराण कथा सोहळ्याचा शुभारंभ नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते यज्ञ कुडांचे पूजन करून झाला त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी ह.भ.प. मोहन महाराज सुडके हे होते. कथाकार भीमाशंकर येथील बालकदास महात्यागी, भीमाशंकर येथील पुजारी रामचरणदास, ठाकूरदास महात्यागी, अमरदास महात्यागी, मनोहरदास महात्यागी, घनश्यामदास महात्यागी, उज्जैन येथील ब्राह्मण पंडित राजेंद्र उदारे, संतोष आघाव आदीं सह पाथर्डी व कारेगाव परिसरातील भाविक मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थीत होते.

हभप सुडके महाराज म्हणाले, पाथर्डी शहर व परिसर अतिशय भाग्यशाली ठरला आहे. कारेगाव परिसरात मारुती मंदिराची स्थापना करून या डोंगराला एक सुंदर आणि परमार्थिक स्वरूप महंत महामंडलेश्वर आणणारे लालदास महाराज यांनी समाजात धनधान्य, आरोग्य समृद्धी नांदावी, या धार्मिक व परोपकारी भावनेने महामृत्युंजय यज्ञ तसेच भाविकांना श्रवण करण्यासाठी शिवमहापुराण कथेचे आयोजन केले आहे. महाराजांचे हे धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय असे कार्य आहे. तरी या महामृत्युंजय मंत्र व शिवमहापुराण कथेचा भाविकांनी लाभ घ्यावा.

यावेळी महंत लालदास महाराज यांच्या हस्ते नगराध्यक्ष अभय आव्हाड , सुडके महाराज तसेच उपस्थित संत महंतांचा सत्कार करण्यात आला. उमेश केकान यांनी स्वागत करून सर्वांचे आभार मानले.

या यज्ञ सोहळ्यात नित्य रोज अभिषेक, हवन होईल. सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत भीमाशंकर येथील बालकदास महात्यागी आपल्या वाणीतून शिव महापुराण कथा निरूपण करतील. मंगळवार दिनांक १९ रोजी यज्ञाची पूर्णाहुती होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती हनुमान टेकडीचे महंत महामंडलेश्वर लालदास महाराज यांनी दिली.

# विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्र परिषद शिक्षा वर्गाचा कोकमठाण येथे समारोप

## दहा दिवसीय प्रशिक्षण वर्गात पश्चिम महाराष्ट्र, कोकण व गोवा येथील कार्यकर्त्यांचा सहभाग

**● कोपरगाव | वीरभूमी–**

विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्राचा परिषद शिक्षा वर्गाचा समारोप बुधवार, दि. १३ मे रोजी संपन्न झाला. दि. ३ मे ते १३ मे या कालावधीत कोकमठाण येथील आत्मा मालिक ध्यानपीठ विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट येथे हा दहा दिवसीय वर्ग आयोजित करण्यात आला होता. वर्गाचे आयोजन विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत व उत्तर अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले होते. पश्चिम महाराष्ट्र, कोकण प्रांत आणि गोवा येथील विविध जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनी या वर्गात सहभाग घेतला.

समारोप कार्यक्रमास क्षेत्र मंत्री रामचंद्र रामुका, आत्मा मालिक ध्यानपीठाचे प.पू. परमानंदजी महाराज, प्रांत अध्यक्ष तथा वर्ग प्रमुख प्रा. गजानन धरणे, वर्ग पालक तथा समरसता क्षेत्र प्रमुख नरेश पाटील, क्षेत्र संघटन मंत्री अनिरुद्ध पंडित, प्रांतमंत्री किशोर चव्हाण, विहिंप केंद्रीय विश्वस्त प्रभाकरराव शिंदे, प्रांत विधी प्रकोष्ठ प्रमुख ड. शैलेश भावसार, प्रांत धर्मप्रसार प्रमुख तथा बौद्धिक प्रमुख ड. मृणालिनी पडवळ, प्रांत निधी प्रमुख धनाजी शिंदे, प्रांत सेवा सहप्रमुख शर्वरीताई एरगट्टीकर, विभाग सहमंत्री विशाल वाकचौरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सहभागी शिबिरार्थींनी आपले अनुभव कथन केले. नरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. गजानन धरणे यांनी संपूर्ण वर्गाचा आढावा सादर केला.

या दहा दिवसांच्या प्रशिक्षण वर्गात देशभरातील विविध केंद्रीय पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय संघटन मंत्री मिलींद परांडे, अमरीशजी, विवेक कुलकर्णी, प्रा. संजय मुदराळे, मोहन सालेकर आदी मान्यवरांनी विविध विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

वर्गार्थींनी बौद्धिक सत्र, कृती सत्र, चर्चासत्र आणि संवाद सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. अनुभवी पदाधिकाऱ्यांनी संघटन कौशल्य, कार्यविस्तार आणि समाजजागरण याविषयी मार्गदर्शन केले. हिंदू समाजातील उच्च–नीच भेदभाव




आणि सामाजिक असमानतेमुळे धर्मांतरणाच्या समस्या निर्माण होत असून, घरवापसी व परावर्तनाच्या कार्याचा विस्तार आवश्यक असल्याचे वक्त्यांनी सांगितले. तसेच लव्ह जिहाद आणि लँड जिहाद यांसारख्या समस्यांवरही त्यांनी भाष्य केले.

समारोपीय भाषणात रामचंद्र रामुका यांनी प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या ग्राम, प्रखंड, जिल्हा आणि विभागाची माहिती घेऊन सर्वव्यापी व सर्वस्पर्शी हिंदुत्वाचे कार्य करावे, असे आवाहन केले. डॉक्टर, वकील, व्यावसायिक यांच्यासह समाजातील सर्व घटकांना संघटनात सामावून घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सामाजिक समरसता टिकवून महापुरुषांच्या जयंती व जन्मोत्सव सामूहिकरीत्या साजरे करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

वस्ती–वस्तीमध्ये जाऊन हिंदुत्व जागरणाचे कार्यक्रम राबवावेत, असे सांगताना त्यांनी तलासरी येथे माधवराव काणे यांनी सुरू केलेल्या वसतिगृह व शाळेच्या कार्याचा उल्लेख केला. त्यामुळे धर्मांतरणाला आळा बसून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अशोक सिंघल यांनी राजस्थानातील मसवाडा भागात मोठ्या प्रमाणात घरवापसी अभियान राबविल्याचे उदाहरणही त्यांनी दिले.

गोवा येथील मातृछाया प्रकल्पाचा उल्लेख करताना सेवा वस्त्यांमध्ये संस्कार शाळा व सांस्कृतिक जागरणाचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. गोवंश हत्या बंद व्हावी, रसायनमुक्त गो–आधारित शेतीला प्रोत्साहन द्यावे आणि गो–उत्पादनांचा वापर वाढवावा, असे आवाहनही करण्यात आले.

सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी संत प्रवास, तसेच सण–उत्सवांच्या माध्यमातून संघटनात्मक कार्य अधिक बळकट करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. नवीन ठिकाणी कार्य सुरू करताना सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

समारोप सत्रात आत्मा मालिक अध्यात्मिक ध्यानपीठाचे संत सद्गुरू परमानंदजी महाराज यांनी आशीर्वचन दिले. आत्मा मालिक ज्ञानपीठ विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या वतीने उपस्थित सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी स्वागत केले व हिंदुत्व कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आत्मा मालिक ध्यानपीठ विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टमार्फत प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे चालविली जात असून, विद्यार्थ्यांना संस्कारित व सक्षम नागरिक घडविण्याचे कार्य सुरू असल्याचे स्वामीजींनी सांगितले. येत्या काळात हिंदुत्व जागरण अधिक व्यापक होऊन समाजातील विविध समस्या दूर व्हाव्यात, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

वर्गाची व्यवस्था प्रांत सहमंत्री तथा पालक ॲड. सतीश गोरडे, महाव्यवस्था प्रमुख विशाल वाकचौरे, जिल्हा मंत्री सुरेंद्र महाले यांच्या नेतृत्वाखाली योगेश मखाना, तुषार ठाकूर, दीपक शिनगर, शुभम मुर्तडक, राकेश भोकरे, प्रशांत बहिरट, गीता परदेशी, आशा महाले, ज्ञानेश्वरी ठाकूर आदी कार्यकर्त्यांनी पाहिली.

## बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार, पीक विमा कंपन्यांच्या

# दिरंगाईवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करा

### पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक

**अहिल्यानगर । वीरभूमी –** बोगस बियाणे व खत विक्रेत्यांवर केवळ परवाने निलंबित करण्याची औपचारिक कारवाई न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत, खतांचा काळाबाजार, सक्तीची जोडविक्री व निर्धारित दरापेक्षा जास्त दराने विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या पीक विमा कंपन्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संचालक डॉ. जी. के. ससाणे, डॉ. प्रशांत बोडके, दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले, आमदार किरण लहामटे, उपविभागीय महसूल, कृषी अधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, खरीप हंगामात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे. जिल्ह्यात खतांचा पुरेसा राखीव साठा उपलब्ध ठेवण्यात आला असून, पारंपरिक युरिया व डीएपीला प्रभावी पर्याय म्हणून 'नॅनो युरिया' व 'नॅनो डीएपी'च्या वापरास प्रोत्साहन द्यावे. खत खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी खतांच्या पिशव्यांवरील 'क्यूआर' प्रणाली व इलेक्ट्रॉनिक विक्री यंत्रणा प्रभावीपणे राबवावी. सर्व कृषी सेवा केंद्रांवर खतांचे दर व उपलब्ध साठा दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेमार्फत विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करावे, जेणेकरून नैसर्गिक शेतीकडे इतर शेतकरी प्रेरित होतील, असे त्यांनी सांगितले.

शेतमजुरांच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन नोंदणीकृत मजुरांना प्रत्यक्ष शेतीच्या कामात सहभागी करून घ्यावे. निष्क्रिय मजुरांबाबत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करून शेतीची कामे वेळेत पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शेतकऱ्यांपर्यंत कृषी विभागाच्या योजना, हवामान अंदाज व आधुनिक तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी गावपातळीवर व्हॉट्सप गट तयार करावेत. शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट व 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

राज्याबाहेरून, विशेषतः सीमावर्ती भागांतून येणाऱ्या बोगस बियाण्यांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांच्या मदतीने तपासणी नाके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कापूस, सोयाबीन व रब्बी ज्वारीच्या बियाण्यांमध्ये झालेल्या फसवणुकीची गंभीर दखल घेत अनधिकृत विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

खरेदी केलेल्या खतांच्या वाहतुकीसाठी शेतकऱ्यांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत 'राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स' कंपनीकडून १०० किलोमीटरपर्यंत उपलब्ध असलेल्या



मोफत वाहतूक सुविधेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, जिल्ह्यात खते व बियाण्यांची कृत्रिम टंचाई तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणावर विशेष भर देण्यात आला आहे. आतापर्यंत ११ हजार तपासण्या पूर्ण करून १०३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात २ पोलीस केसेस व १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जागतिक परिस्थितीमुळे युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन ५ हजार ४०० मेट्रिक टन खताचा राखीव साठा निर्माण करण्यात आला असून, त्यापैकी ७५० मेट्रिक टन साठा सध्या उपलब्ध आहे. अल-निनोच्या पार्श्वभूमीवर कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांबाबत विशेष जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली असून, पीएमएफएमई योजनेत सलग दोन वर्षे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. कृषी यांत्रिकीकरणात एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारा हा राज्यातील एकमेव जिल्हा ठरला आहे. 'महा-विस्तार' पवर ३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, जिल्ह्यात १२ हजार ५०० एकर क्षेत्रावर नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू असल्याची माहितीही डॉ. आशिया यांनी दिली.

बैठकीत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी सादरीकरण केले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माहितीपुस्तिकेचे व संतुलित खत वापर जागरूकता अभियान पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले.

## पाथर्डी शहरातील नागरिकांची पाण्यासाठीची वणवण थांबवा

### नगरसेविका दिपाली बंग । पाण्याची मागणी वाढल्याने तीन दिवसांआड पूर्ण दाबाने पाणीपुरवठा करावा

**पाथर्डी । वीरभूमी–** कडक उन्हाळा, लग्नसराई, शाळांच्या सुट्ट्या आणि पुढील आठवड्यापासून सुरू होणारा अधिक मास यामुळे शहरात पाहुण्यांची वर्दळ वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा आणि किमान तीन दिवसांनी पूर्ण दाबाने पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका दिपाली बंग आणि माजी नगरसेवक रामनाथ बंग यांनी पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या निवेदनाच्या प्रती आमदार मोनिका राजळे आणि नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनाही देण्यात आल्या आहेत.

याबाबत माहिती देताना माजी नगरसेवक रामनाथ बंग म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून शहरासह प्रभाग क्रमांक पाचमधील पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. पूर्वी तीन ते चार दिवसांनी होणारा पाणीपुरवठा आता सात ते आठ दिवसांनी होत असल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे.

अधिक मासात विविध धार्मिक कार्यक्रम, व्रत-वैकल्ये आणि धोंडे जेवणासारखे पारंपरिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामुळे घराघरात पाहुण्यांची संख्या वाढते आणि पाण्याची गरजही नैसर्गिकरीत्या वाढते. त्यातच तीव्र उष्णतेमुळे बहुतांश नागरिकांच्या घरी कुलर सुरू असून त्यासाठीही अतिरिक्त पाणी लागते.

पूर्वी शहराला दररोज ३२ ते ३५ लाख लिटर पाणी मिळत असल्याने तीन दिवसांआड पाणीपुरवठा होत होता. मात्र, सध्या प्रादेशिक पाणीपुरवठा विभागाकडून तासाला केवळ एक लाख ७० हजार ते एक लाख ८० हजार लिटर पाणी मिळत आहे. तेही केवळ सात ते आठ तास उपलब्ध होते. यामध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने शहराला अत्यल्प पाणी मिळत असून पाणीपुरवठ्याचे आवर्तन वाढले आहे, असे बंग यांनी सांगितले.

या परिस्थितीत नागरिकांना पाणी विकत घेण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. नियमित पाणीपट्टी भरूनही नागरिकांवर पाणी खरेदी करण्याची वेळ येत असल्याने लोकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या सर्व समस्यांचा विचार करून आमदार मोनिका राजळे आणि नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी तातडीने लक्ष घालावे. पाणीपुरवठा योजना विभाग, वीज वितरण कंपनी, पालिकेचा पाणीपुरवठा विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलवावी. तसेच सर्व नगरसेवकांना सहभागी करून प्रत्येक प्रभागातील परिस्थितीचा आढावा घेत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रामनाथ बंग यांनी केली.

## डॉ. आनंद नाडकर्णी यांना स्नेहालयच्या 'मानसग्राम' प्रकल्पातर्फे श्रद्धांजली अर्पण

**अहिल्यानगर । वीरभूमी–** मानसशास्त्र अत्यंत सोप्या भाषेत मांडून सर्वसामान्यांना मनाचा अभ्यास करायला शिकवणारे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या वैचारिक आणि वैद्यकीय क्षेत्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या निधनानंतर स्नेहालय संचलित 'मानसग्राम' प्रकल्पाच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत डॉ. नाडकर्णी यांच्या कार्याला उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

स्नेहालयच्या 'मानसग्राम' प्रकल्पाच्या उभारणीत डॉ. आनंद नाडकर्णी यांचा मोलाचा वाटा होता. मानसग्रामची इमारत कशी असावी, मानसिक रुग्णांशी संवाद कसा साधावा आणि उपचारांची दिशा काय असावी, याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले होते. त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून त्यांनी स्नेहालयच्या टीमला ठाणे येथे दोन तास विशेष मार्गदर्शन दिले होते. त्यांच्या निधनाने मानसग्रामने आपला एक मार्गदर्शक आणि शिल्पकार गमावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

मानसग्राम प्रकल्पाच्या माध्यमातून डॉ. नीरज करंदीकर, सौ. दीप्ती करंदीकर, डॉ. तेजस्विनी मिस्किन, डॉ. तेजस्विनी सोनवणे, डॉ. मेघना मराठे आणि संपूर्ण स्नेहालय परिवारातर्फे या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रकल्प समन्वयक रमाकांत दोड्डी यांनी डॉ. नाडकर्णी यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, डॉ. नाडकर्णी सरांनी केवळ उपचार केले नाहीत, तर समाजाला मानसिक आरोग्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन दिला. मानसग्रामची उभारणी करताना त्यांनी दिलेले सल्ले आजही आमच्यासाठी दीपस्तंभासारखे आहेत.

या शोकसभेस मानसग्राम प्रकल्पातील सर्व कर्मचारी तसेच स्नेहालय परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना या कठीण प्रसंगातून सावरण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

## रक्तदान करुन रांधे येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**पारनेर । वीरभूमी–** तालुक्यातील रांधे (माळवाडी) येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान परिसरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या पावन दिनी भक्ती, समाजसेवा आणि संस्कारांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. भव्य रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा व महाप्रसाद कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

यावेळी साईनाथ विद्यालय अळकुटी, धर्मनाथ विद्यालय जवळा, केदारेश्वर विद्यालय बाभुळवाडे, सुंदराबाई लंके विद्यालय वडझिरे तसेच शारदाबाई पवार विद्या निकेतन बारामती आदी विद्यालयांतील इयत्ता दहावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या १६ गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

पूना ब्लड सेंटरच्या वतीने किरण औटी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित रक्तदान शिबिरात युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. श्री स्वामी समर्थ देवस्थान, रांधे हे अल्पावधीतच भक्तांच्या श्रद्धास्थानाचे केंद्र बनले असून पारनेर तालुक्यासह परिसरातील विविध भागांतून भाविक येथे दर्शनासाठी येत असल्याचे आमदार



दाते यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी संस्थापक अनिल आवारी व सर्व सेवेकऱ्यांचे विशेष अभिनंदन केले.

यावेळी महाप्रसादाचे आयोजन भिमाजी घुले, डॉ. संदीप डफळ, युवराज ढवण, जितेंद्र राऊत, श्री. शंकर लामखडे, चंद्रकांत ढवण, महेंद्र शेटे, पंढरीनाथ वराळ, श्री. ज्ञानेश्वर निचित, संतोष ढवण, पत्रकार योगेश खाडे, दशरथ ढवण, शालूबाई आवारी यांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी वसंतराव चेडे, आर.एस. कापसे, सुभाष भोसले, विकास पवार, मेजर नरसाळे, मच्छिंद्र टावरे, दत्तात्रय बाबर, भास्कर जाधव, कैलास आवारी, सतीश लामखडे, संतोष आवारी, संतोष खडके, दिलीप आवारी, दीपक मावळे, अनिल गाडगे, प्रशांत पवार, सुधीर परंडवाल, प्रतीक कापसे, लहू गागरे, सखाराम भंडारी, रावसाहेब भदे, विठ्ठल आवारी, पोपट आवारी, संदीप गहाणडूले, बाळासाहेब आवारी, गोरख आवारी, रवी पावडे, किसन चौधरी, प्रविण वराळ, दीपक वरखडे, अजित आवारी, सचिन शेंडकर, गणेश क्षीरसागर, नितीन लंके, किशोर कुंभकर्ण यांच्यासह पुष्पाताई वराळ, सोनल आवारी, रेश्मा गलांडे, वर्षा भोसले, सारिका सरोदे, छाया पावडे, आश्विनी वरखडे, रेश्मा वराळ, सीताबाई गहाणडूले, मीनाक्षी काटे, जयश्री पावडे, सुनीता सरोदे, लता टावरे, रेश्मा खडके, चंद्रभागा आवारी, पमाबाई आवारी, रुपाली आवारी, सुरेखा आवारी, शकुंतला भदे, सुरेखा भंडारी आदींसह हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.